ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 12 | ISSUE - 7 | MARCH - 2026

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# भारतातील ब्रिटिश सरकारचे स्त्री शिक्षण धोरण : एक अभ्यास




**Dr. Gavit Yashavant Chema**
**G.V.S. Arts and Science College Bamkheda**
**Tal-Shahada Dist-Nandurbar.**

## प्रस्तावना:

ब्रिटीशपुर्व काळात भारतातील स्त्रीयांचे जिवन अत्यंत हलाखीचे होते. स्त्रियांच्या बाबतीत समाजात अनंत रुढी परंपरा प्रचलित होत्या. 'चूल आणि मूल'एवढेच तिचे जिवीत कर्तव्य मानलेजात असे.स्त्रीयांना आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक राजकीय असे सर्वच हक्क नाकारण्यात आले होते. अशा अवस्थेत भारतात ब्रिटिश सत्तेची स्थापना झाली. ब्रिटिश संपर्कामुळे उदारमतवाद, मानवतावाद स्वातंत्र्य , समता, बंधुता या नवसंकल्पनाचा भारतीयांना परिचय झाला. त्यातुनच समाजसुधारकांची एक पिढीच निर्माण झाली. त्यांनी स्त्रियांची परिस्थिती सुधारण्यासाठी कार्य सुरु केले. त्याचाच एक भाग म्हणून महात्मा फुले यांनी पुण्यात मुलींची पहिली शाळा सुरु केली.त्याचा प्रभाव ब्रिटीश राजवटीवर झाल्याशिवाय राहीला नाही. आपणही राज्यकर्ते या नात्याने स्त्रिशिक्षणाकडे लक्षदिले पाहीजे असे इंग्रजांना वाटू लागले.

## उदिष्टे :-

1) भारतातील स्त्री शिक्षणाचाअभ्यास करणे.
2) ब्रिटिशांच्या स्त्रीशिक्षण धोरणाविषयी माहीती मिळविणे.
3) ब्रिटिशांच्या स्त्रीशिक्षण सुधारणा अभ्यासणे.

## गृहितके:-

1) इंग्रजांनी भारतात पाश्चात्य विचार रुजविले.
2) इंग्रजांनी भारतात पाश्चात्य शिक्षण सुरू केले.
3) इंग्रजांनी भारतातस्त्री शिक्षणासाठी अनेक कायदे पास केले.

**संशोधन पद्धती :-** भारतातील ब्रिटिश सरकारचे'स्त्रीशिक्षण धोरण: एक अभ्यास' या लघुशोधनिबंधासाठी खालील संशोधनपदध्दतीचा वापर केला .

1) ऐतिहासीक संशोधन पध्दत
2) अन्वेषणात्मक संशोधन पद्धत
3) ग्रंथालयीन संशोधन पद्धत

**संशोधन साधने :-** प्रस्तुत संशोधनासाठी खालील ग्रंथालयांना प्रत्यक्ष भेटी देऊन प्रस्तुत संशोधन साधनांचे संकलन केले.

1) ग्रंथालय, कला व विज्ञान महाविदयालय बामखेडा
2) मध्यवर्ती ग्रंथालय, पूज्य साने गुरुजी विदयाप्रसारक मंडळ शहादा .
3) स्वामीविवेकानंदवाचनालय खरवड ता.तळोदा.

महात्मा फुलेंचे स्त्रिशिक्षण कार्य लक्षात घेऊन इंग्रजांनी भारतात स्त्री शिक्षण सुधारणा करण्याचे ठरविलेत्याचे सर्व श्रेय त्या वेळचे गव्हर्नर जनरल लॉर्ड डलहौसी यांना दिले जाते. त्यांनी सर्वप्रथम ब्रिटिश सरकारला स्त्री शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले एवढेच नव्हे तर स्त्रीशिक्षण ही सरकारची जबाबदारी असल्याचे प्रतिपादन केले म्हणून 1854 च्यावुडच्या खलीत्यानुसार भारतातील स्त्रीशिक्षणाची जबाबदारी सरकारने स्वीकारली.[1] इंग्रजांनी स्त्रीशिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी मुलींचे विशेष वर्ग चालविणाऱ्या शिक्षकांना इनामे देण्यास प्रारंभ केला. एवढेच नव्हे तर सरकारने स्थानिक फंड गोळा करून स्त्री शिक्षणासाठी जास्तीचा पैसा उभारला. स्त्री शिक्षणाला गती प्रदान करण्यासाठी शिक्षिका प्रशिक्षण केंद्र उभारले सरकारच्या या धोरणामुळे भारतातील मुलींना व्यवहारिक व व्यवसायिक शिक्षण मिळू लागले.

1882 मध्ये लॉर्ड रिपन ने बदलत्या परिस्थितीनुसार शिक्षण क्षेत्रात काही बदल सुचविण्यासाठी हंटर कमिशनची नियुक्ती केली.[2] हंटर कमिशनचे भारतात आगमन झाले तेव्हा महात्मा फुलेंनी हंटर कमिशन समोर स्त्री शिक्षणाची साक्ष देऊन स्त्री शिक्षणाची आवश्यकता इंग्रजांच्या लक्षात आणून दिली. त्याचा योग्य तो प्रभाव पडला. हंटर कमिशनने स्त्री शिक्षणाचा विस्तार करण्यासाठी काही महत्त्वाच्या शिफारशी सुचविल्या त्या पुढील प्रमाणे

1) स्त्रीशिक्षणाचाप्रचारप्रसारासाठीमुलींच्याशाळांनासरकारीअनुदानद्यावे.
2) स्त्रीशिक्षणाचीजबाबदारीसरकारनेघ्यावी.
3) स्त्रीशिक्षणाच्यामार्गदर्शनासाठी स्वतंत्र तपासणी कक्ष स्थापन करावा.
4) स्त्रीशिक्षणासाठी प्रशिक्षित शिक्षकांची नियुक्ती करावी.

सरकारच्या या स्त्रीशिक्षण विषयक धोरणामुळे 1901- 1902 मध्ये पदवी शिक्षण घेणाऱ्या स्त्रीयांची संख्या 264 पर्यंत गेली होती .[3] तरीही भारतीय स्त्रियांची उच्च शिक्षणातील प्रमाण अत्यंत नगण्य होते म्हणून लॉर्ड कर्झनने1904 मध्ये विद्यापीठ कायदा पास केला.

काळानुसार भारतीय शिक्षणात बदल सुचविण्यासाठी इंग्लंडमधील लीड्स विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.सॅडलर यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिशन नियुक्त करण्यात आले. त्याला भारतीय इतिहासात सॅडलर कमिशन असे म्हणतात.[4] त्यांनी स्त्री शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी खालील शिफारशी केल्या.

1) कलकत्ता विद्यापीठात स्त्रीशिक्षण बोर्डाची स्थापना करण्यात यावी.
2) तरुण मुलींना शिक्षण देण्यासाठी ‘ पडदा शाळा ’ सुरू कराव्यात.
3) स्त्री शिक्षण बोर्डाने स्त्री शिक्षणासाठी विशेष अभ्यासक्रम तयार करावा.
4) स्त्रीशिक्षणात आरोग्य शिक्षणाचा समावेश करावा.

भारतीय शिक्षणाची गुणवत्ता वाढवण्यासाठी 1929 मध्ये ब्रिटिश सरकारने ‘हरटॉग’ समिती नियुक्त केली. या समितीने स्त्रीशिक्षणाला उत्तेजन देण्यासाठी विविध तरतुदी केल्या त्या पुढील प्रमाणे.

1) स्त्री शिक्षणाची योजना उच्च विद्या विभूषित स्त्रीकडे सोपवावी.
2) मुलांप्रमाणे मुलींनाही शिक्षण द्यावे.
3) प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे.
4) स्त्रीयांना लोकल बोर्डात व शिक्षण संस्थेत योग्य प्रतिनिधीत्व द्यावे.
5) स्त्रीयांना उच्च शिक्षण देण्यात यावे.
6) स्त्रीयांना आरोग्य गृह विज्ञान व संगीत विषयाचे ज्ञान द्यावे.
7) स्त्रीयांना व्यवसायिक शिक्षण देण्यात यावे.
8) शिक्षणासाठी प्रशिक्षित शिक्षकांची नेमणूक करावी.
9) ग्रामीण भागातील स्त्री शिक्षणाकडे विशेष लक्ष द्यावे.

स्वातंत्र्यपूर्वकाळातील'हरटॉग'कमिशनस्त्रीशिक्षणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे मानले गेले आहे. कारण या कमिशनच्या शिफारशीमुळे भारतातील स्त्री शिक्षणाचा विस्तार घडून आला.स्त्रीयांचे शिक्षणातील प्रमाण वाढले या कमिशनचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे ग्रामीण भागातहीस्त्री शिक्षणाची गंगा पोहोचली.

## निष्कर्ष :-

ब्रिटिश काळातच भारतातील स्त्री शिक्षणाला प्रारंभ झाला. भारतातील सनातनी लोकांना न जुमानता इंग्रजांनी भारतात स्त्री शिक्षणाला महत्व दिले. वेळप्रसंगी भारतीय समाजाचा विरोध पत्करुन अनेक कायदे करून स्त्रीशिक्षणाच्या विस्तार घडवून आणला. इंग्रजांच्या या स्त्री शिक्षण धोरणामुळे स्वातंत्र्य चळवळीच्या काळात अनेक शिक्षित स्त्रियांचा उदय आणि विकास घडून आला. ब्रिटिश काळात जरी स्त्री शिक्षणाचे प्रमाण कमी असले तरी, त्यांनी भारतात स्त्री शिक्षणाचा पाया घातला. असे म्हणणे वावगे ठरणार नाही. वर्तमान भारतातील स्त्री शिक्षण धोरण इंग्रजांच्या या स्त्री शिक्षण धोरणावरच अवलंबून आहे. असे असले तरी आजही भारतातील काही भागात, पर्वतीय प्रदेशात, खेड्यापाड्यातस्त्री शिक्षणाचे प्रमाण नगण्य आहे. अशा ठिकाणी स्त्री शिक्षणाचे प्रमाण वाढविण्यासाठी प्रस्तुत शोधनिबंध शिक्षणप्रेमी लोकांना, समाजसेवी संस्थांना मार्गदर्शक ठरेल असा विश्वास वाटतो.

## संदर्भ सुची :-

1) बोर्डे सुनिता, खडसे संतोष ऐतिहासिक प्रीप्रेक्ष्यातील स्त्रीया शुभम पब्लिकेशन्स पुणे 2010 पृ.99.
2) पवार जयसिंगराव, पवार वसुधा आधुनिक हिंदुस्थानचा इतिहास विदया प्रकाशन नागपुर 2002 पृ.289
3) सुनिता, खडसे संतोष ऐतिहासिक प्रीप्रेक्ष्यातील स्त्रीया शुभम पब्लिकेशन्स पुणे 2010 पृ.100
4) पवार जयसिंगराव,पवार वसुधा आधुनिक हिंदुस्थानचा इतिहास विदया प्रकाशन नागपुर 2002 पृ.294.